मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड.

कार्यालयीन आदेश

(प्रशासन विभाग)

जा.क./ 9369 /2026
दिनांक : 23/03/2026

निम्नस्वाक्षरीकार यांचे असे निदर्शनास आले आहे की, प्रत्येक वेळी कारागृह भेटी दरम्यान आरोपी तोंडी तकार करतात की, त्यांना पोलीस बंदोबस्ता अभावी न्यायालयात हजर केले जात नाही.

सदर बाब ही मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांचे लक्षात आणुन दिल्यानंतर असे निर्देशीत करण्यांत आले आहे की, ज्यावेळी पोलीस बंदोबस्ता अभावी न्यायालयीन बंद्यांना न्यायालयात हजर केले जाणार नाही त्यावेळी त्यांना व्ही.डी.ओ. कॉन्फरन्सद्वारे त्यांची हजेरी घेण्यात यावी.

सबब, निम्नस्वाक्षरीकार हे न्यायाधीन बंद्यांना व्ही.डी.ओ. कॉन्फरन्सव्दारे हजर ठेवणे बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहेत.

अ. क	कामकाजाच्या तारखा	पदभार ठेवलेल्या न्यायालयांचे नाव व पदनाम
1.	दिनांक 01 एप्रील–2026 ते दिनांक 15 एप्रील–2026	श्रीमती एम.एस.पठारे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क. 2 बीड
2.	दिनांक 16 एप्रील–2026 ते दिनांक 30 एप्रील–2026	श्री. आर.एस.ए.शेख, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क. 1 बीड

टिप :
1. सबंधीत दिवशी नमूद न्यायीक आधिकारी जर कांही कारणास्तव मुख्यालयी हजर नसतील, सुटटीवर, रजवेर, उन्हाळी/हिवाळी सुटटीवर अथवा वैदयकीय रजेवर असतील तर त्यांचा कार्यभार ज्यांचेकडे सोपविला आहे ते न्यायीक आधिकारी व कर्मचारी वरील काम पाहतील.
2. सदर व्ही.सी. न्यायालयात उपलब्ध असलेल्या व्ही.डी.ओ. कॉन्फरन्स सुविधाद्वारे आपआपल्या न्यायालयात डायसवर घेण्यात यावी
3. सदर काम हे सकाळी 11.00 ते दुपारी 12.00 वाजेपर्यंत करावे.
4. फक्त बीड तालुका न्यायालयाच्या हद्यीत येणा–या (मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,बीड) यांचे हद्यीत येणा–या न्यायाधीन बंदी यांचे काम पहावे
5. व्ही.सी. वर हजर राहणा–या आरोपींची माहिति संबंधीत न्यायालयास तात्काळ कळविण्यांत यावी.

सदरील आदेश दिनांक 01/04/2026 रोजीच्या माध्यान्हपुर्व पासुन लागु होतील.

आपला विश्वासू,

(प्रविण रा.शिंदे)
मुख्य न्यायदंडाधिकारी,बीड.